# मालवणी ऑडिशन स्क्रिप्ट | Short Audition Script Marathi

## पूर्वकल्पना :

एक गावातला माणूस आहे कर्तव्याने सध्या तो त्या गावचा सरपंच आहे , एके दिवशी गावातला एक मुलगा त्याच्या मुलीची छेड काढतो . हे सर्व त्याला कळताच त्या मुलाची खंबर घेण्यासाठी तो त्याच्या घरी जातो . घरी येवून तो त्या मुलाला आणि त्याच्या वडिलांना चांगलाच जाब विचारतो.

**ही स्क्रिप्ट सादर करताना त्या व्यक्तीच्या भावना लक्षात घेण महत्वाच आहे एकतर तो संतापलेला आहे ,त्यात तो सरपंच आहे , एका, मुलीचा बाप आहे, तसेच ज्याच्याशी तो जाब विचारायला गेला आहे तो व्यक्ति ही त्याच्या परिचयाचा आहे. त्यामुळे मध्ये मध्ये पत्राच्या जबाबदारीनुसार आवाज चड-उतार ठेवणं महत्वाच आहे।**

## पात्र :

गावातला माणूस ( सरपंच ) वय वर्ष ३०-४०

## वेळ :

१ मिनिट ४० सेकंद

## Short Audition Script Marathi For Male | शॉर्ट ऑडिशन स्क्रिप्ट मराठी फॉर मेल

" पपल्या तुझ्या झीलाक काय ता सांगान ठेव " ....

काय झाला ?

"अरे काय झाला म्हणान काय इचारतस . तुझ्या झीलाकच इचार."

"नाय ना तो नाय सांगाचो , थांब मीच सांगतय. काल भर रस्त्यावर तुझ्या झीलान माझ्या चेडवाचो हात धरल्यान."

'अरे गावचो सरपंच असय मिया ', आणि माझ्याबरोबरच जर ह्या असा होवक लागला तर गावातल्या गरीब -सरिबाचा काय ?
नाय नाय हेचो काय तो निर्णय तुका घेवचो लागतलो आणि तो सुद्धा आजच हयच्या हय.नायतर एकदा काय ह्या प्रकरण माझ्या हाताच्या भायर गेला काय मीच काय देव सुद्धा तुका वाचवुक येवचो नाय .कळला काय ?

ए तु फुडें ये रे... 'माझ्या चडवाक काय सोना लागला हा '? काय तुझ्या घरातली वस्तू हा ती मनात येयत तशी आपल्या मनासारखी वापरायची.

प्रेम बीम म्हटलंस ना तर माझो हात उचलात हा मि अधिच सांगतय.आणि कसला प्रेम रे ? तुझा वय काय ..तु बोलतस काय ..कायतरी वाटाक होया तुका.

स्वतःची चड्डी घेवची तरी अक्कल हा काय आपली , दिवभर 50 रुपयाचा पेट्रोल टाकून गावभर फिरला मगे झाला नाय. आधी दोन दमडे कमवा ,स्वतःचा कायतरी घेवा आणि मगे हे असले धंदे करा.

काय शीरता तरी सांगतय ता ? नायतर " पालथ्या घड्यार पाणी " .

अरे बापूस दिवसभर लोकांच्या मजुरेक फिरता , तेच्यान झेपत नाय तरी लोकांची कामा करता तेचा वायच कायतरी ठेव.
तेची हाडा ची काडा झाली तरी बिचरो लोकाच्या कामाक जाता.

पपल्या तुझ्याकडे बघून माका गप रवाचा लागता समजला , पोलिसांचा नाव लागला तर आयुष्यभर घरात बसाचा लागात . " परत कधी माझ्या चेडवाच्या वाटेक हेना जाता कामा नये " , आणि जर चुकान गेलोच तर माझ्यासारखो वायट कोण नाय समजला .?
चल येतंय मी......